**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**

**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४**

**इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी सन २०२१-२२ साठी वार्षिक नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी बाबतचे परिपत्रक**

परिपत्रक क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/५६२. दिनांक १४ जुलै २०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | नोंदणी शुल्क | शिक्षण संक्रमण वर्गणी |
|---|---|---|---|
| १) | **इयत्ता १० वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू.१०००/-** | **रू.५००/-** |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू.२००/-** | |
| २) | **इयत्ता १२ वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू.१०००/-** | **रू.५००/-** |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू.४००/-** | |

मंडळाच्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रत्येक महिन्याचे किमान २ अंकांचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरी उपरोक्तप्रमाणे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण दोन अंकांची वर्गणी विभागीय मंडळाकडून देण्यात आलेल्या चलनाद्वारे जमा करताना सोबतची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ॲडव्हाईस नोट या कार्यालयाच्या शाखा लेखाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी रक्कम स्वतंत्र चलनाद्वारे बँकेत जमा करण्यात यावी. दिनांक १० ऑगस्ट २०२१ नंतर पाठविल्या जाणाऱ्या नोंदणी शुल्कासाठी शाळांना/कनिष्ठ महाविद्यालयांना खालीलप्रमाणे दंडासहीत नोंदणी शुल्क आकारण्यात येईल यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| १) दिनांक ११ ऑगस्ट ते दिनांक ३१ ऑगस्ट | रू.२००/- |
| २) दिनांक ०१ सप्टेंबर ते दिनांक ३० सप्टेंबर | रू.३००/- |
| ३) दिनांक ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रू.५००/- |

सदर नोंदणी शुल्काची व शिक्षण संक्रमण वर्गणी आपल्या नजीकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत चलनाने भरावी. **सदर जमा केलेल्या शुल्काची चलनाची प्रत आपल्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित मंडळाने नेमून दिलेल्या वितरण केंद्रावर दिनांक १० ऑगस्ट २०२१ पर्यंत विना विलंब जमा करण्यात यावी.** चलन भरताना चलनातील रिसिट कोड क्र.०५ (इयत्ता १० वी साठी) व रिसिट कोड क्र.६२ (इ.१२ वी साठी) अशी ☑ खुण करून अचूक रक्कम अंकी व अक्षरी भरावी. नोंदणी शुल्काची (Copy for Divisional Board) चलन व ॲडव्हाईस नोट आपल्या प्रतिनिधीमार्फत कार्यालयाकडे त्वरीत जमा करावी. कोणत्याही परिस्थितीत डी.डी. स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी यापुढे प्रतिवर्षी दिनांक १० ऑगस्ट पूर्वी भरावी. याबाबत या विभागीय मंडळाकडून परिपत्रक पाठविले जाणार नाही असे दिनांक ०२ जून २०१२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तरीही पुन:श्च या बाबी या परिपत्रकाद्वारे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत याची नोंद घेण्यात यावी. नोंदणी शुल्क किंवा विलंब शुल्क किंवा शिक्षण संक्रमण वर्गणीमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत मंडळाकडून वेळोवेळी कळविण्यात येईल. तरी त्याप्रमाणे आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी शुल्क/शिक्षण संक्रमण शुल्क वर्गणी मंडळाच्या परिपत्रकाची वाट न पाहता प्रतिवर्षी न चुकता दिनांक १० ऑगस्टपूर्वी भरावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

टीप: मागील बाजूस नमुने दिले आहेत त्या नमुन्यात माहिती पाठवावी

प्रत माहितीस्तव: मुख्याध्यापक, सर्व वितरण केंद्रे, यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपणामार्फतही आपल्या वितरण केंद्राशी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यलयांच्या निदर्शनास आणावे. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी शुल्काची चलने स्वतंत्रपणे स्विकारावीत व नंतर ती मंडळाकडे शाळानिहाय चलने नेहमीच्या पध्दतीने जमा करावीत.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४**

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ॲडव्हाईस नोट नोंदणी शुल्काकरिता
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय शाळा सांकेतांक क्रमांक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

दिनांक:    /    /२०२१

प्रति,

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

महोदय,

आमच्या शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क रू.            /- (अक्षरी रूपये ----------------------------------------------------) खाली नमूद केल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे.

१) विद्यार्थी संख्या

२) चलन क्रमांक --------------------------- दिनांक --------------------------

३) बँकेचे नाव व शाखा -----------------------------------------

४) नोंदणी शुल्क रक्कम रूपये -----------------------------

५) विलंब शुल्क (दंड)

अ) दिनांक ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट रू.२००/-

ब) दिनांक ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर रू.३००/-

क) दिनांक ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत रू.५००/-

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक/प्राचार्य स्वाक्षरी
(शिक्क्यासह)